वि.दि.दावा क्र. ७८/२०२३
रविंद्र वि. सुमन
निशाणी क्र. ६७

प्रतिवादी क्र. २ तर्फे साक्षीदार क्र.१ शेवंताबाई उर्फ लिलाबाई –

**<u>साक्षीदाराचा सरतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे विद्वान विधीज्ञ कोमल सरोदे यांच्यातर्फे</u>**

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला मराठी भाषेमध्ये समजावुन सांगण्यात आला. त्यावर मी वाचुन, समजुन त्यावर सही केली आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>साक्षीदाराचा उलटतपास वादी तर्फे श्री. सारंग यांद्वारे</u>** –

२. माझे शिक्षण नववी पर्यंत आहे. माझे लग्न सन १९६६ मध्ये झाले आहे. लग्न झाल्यापासुन मी माझ्या सासरी नांदत होते. हे म्हणणे खरे आहे की लग्नानंतर, मी वादग्रस्त मिळकतीमध्ये मी कधीही गेले नाही. हे म्हणणे खरे आहेकी, वादग्रस्त मिळकतीमध्ये कोणाचा कब्जा आहे याची मला माहिती नाही. तसेच आज रोजी वादग्रस्त मिळकतीवर कोणाचा कब्जा आहे याची मला माहिती नाही.

३. माझ्या वडीलांचे नाव बाला लांजेवार होते. माझे वडील मयत झाल्यानंतर, मी, माझा भाउ प्रभु आणि आई वारस होतो. शेतीची सर्व कामे ही आई पाहत होती. हे म्हणणे खरे नाही की मी, माझी आई आणि भाउ प्रभु हे सन १९९० मध्ये सही करण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही रंजना जैस्वाल यांना दिनांक २४/०५/१९९० रोजी खरेदी पत्र करुन दिले होते. दाव्याचे नोटीस मला मिळाले होते. कागदपत्र मिळाले होते किंवा नाही याची मला माहिती नाही. साक्षीदाराला नि.क्र.४२ दाखविण्यात आले, साक्षीदाराने सांगितले की पान क्र.४ वर तिची सही नाही. पान क्र.५ वर देखिल तिची सही आणि अंगठा नसल्याचे साक्षीदाराने सांगितले. सदर विक्रीपत्र रदद करण्याबाबत कोणता दावा दाखल केला आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. विक्रीपत्रावरील सही आणि अंगठा माझा नाही हे दाखविण्याकरीता मी इतर कोणताही पुरावा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की रंजनाकडुन खरेदीचा मोबदला घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की मोबदला घेतल्यानंतर, विक्रीपत्र हे मी, माझा भाउ आणि आईने, दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये रंजना

जैसवाल यांच्या नावाने करुन दिले होते. या शेतीतला एक भाग एजाज खान याला विकला असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील मयत झाल्यानंतर, माझे, माझ्या आईचे आणि प्रभुचे नाव सातबा–यावर लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, विक्रीपत्र करतांना तिघांचीही संमती आवश्यक होती. हे म्हणणे खरे आहे की प्रभुने इजाज खानला जमिन विकतांना माझी आणि माझ्या आईची सही नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी रंजनाकडुन मिळालेला मोबदला हा एकटयासाठीच घेतला असल्यामुळे, इजाज खानला जमिन विकतांना माझी सही घेण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, रंजना जैसवालला जमिन विकल्यानंतर, वादग्रस्त मिळकतीमध्ये माझा कोणताही हक्क राहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्त मिळकत रंजनाला पुर्वीच विकली असल्यामुळे सुमन ठाकरे यांना विकण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी एकच मालमत्ता दोन वेळा विकुन, रंजना आणि रविंद्र यांची फसवणुक केली. सचिन, प्रभुचा मुलगा असल्याबाबतचे कागदपत्रे दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की सुमन ठाकरेच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005

Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.16 17:45:57 +0530

दिनांक १२.०३.२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : Shri. R. J. Khobragade (Gr.-II)